माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ - १२३० / २०१९ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारंत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| अन्सार अहमद | प्राचार्य, दि महाराष्ट्र मेडिकल, एज्युकेशन ॲन्ड रिसर्च सेंटरचे जुलेखबाई वली मोहम्मद युनानी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, आझम कॅम्पस, पुणे ४११ ००१ | प्रथम अपिलीय अधिकारी, दि महाराष्ट्र मेडिकल, एज्युकेशन ॲन्ड रिसर्च सेंटरचे जुलेखबाई वली मोहम्मद युनानी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, आझम कॅम्पस, पुणे ४११ ००१ |

### व्दितीय अपील सुनावणी दिनांक-०४/०९/२०२४

अपिलार्थी यांनी दि.२५/३/२०१९ रोजी राज्य माहिती आयुक्त,खंडपीठ पुणे यांचे कडे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करताना जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला नाही, असे प्रयोजन नमूद केले.

आयोजित सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, मेडीकल एज्युकेशन अँड रिसर्च सेंटरचे जुलेखबाई वली मोहम्मद युनानी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, आझम कॅम्पस, पुणे तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

१. अपिलार्थीचा माहिती अर्ज दि.०५/१२/२०१८ रोजीचा असून तो आयुष संचालनालय, मुंबई यांच्याकडे केलेला आहे. मागणी केलेली माहिती संचालनालयात उपलब्ध नसल्याने व संचालनालयाशी संबंधित नसल्याने कलम ६(३) अन्वये माहिती अर्ज संबंधित संस्थेचे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दि महाराष्ट्र मेडिकल, एज्युकेशन ॲन्ड रिसर्च सेंटरचे जुलेखबाई वली मोहम्मद युनानी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, आझम कॅम्पस, पुणे यांच्याकडे दि.१३/०२/२०१९ रोजी वर्ग केला. त्यानंतर संस्थेचे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले की, माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ त्यांना लागू होत नाही.

२. अपिलार्थीचे प्रथम अपिल दि.१३/०२/२०१९ रोजीचे असुन तो आयुष संचालनालय, मुंबई यांच्याकडे केलेला आहे. त्यावर तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख्य प्रशासकीय अधिकारी, आयुष संचालनालय, मुंबई यांनी, सदर संस्थेस शासनाकडून १०० टक्के नियमित वेतन अनुदान व विविध योजनेंतर्गत निधी मंजूर होत असल्यामुळे सदर महाविद्यालयातील अनुदानाती व विनाअनुदानीत विभागास

माहिती अधिकार अधिनियम लागू होत आहे, त्यामुळे संस्थेच्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरवावी, असे आदेश दिले.

३. त्यानंतर केलेल्या कार्यवाहीचे अभिलेख आयोगास सादर केलेले नाहीत.

४. आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, संस्थेस माहिती अधिकार कायदा लागू होत नाही, हा जन माहिती अधिकारी यांनी काढलेला निष्कर्ष चुकीचा आहे, अपिलीय अधिकारी यांनी माहिती पुरविण्याचे आदेश करुनही त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे स दिसून येते.

५. या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम-२००५ चे कलम २ (एच) मध्ये शासनाचे नोटीफिकेशन (Ordered by appropriate Government) "Any public authority constituted by notification issued or order made by the appropriate government is the public authority" या संदर्भात मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद रिट-पिटीशन क्र.९३०/२०१७ व ८३१८/२०१८ मध्ये दि.१४.०२. २०२२ रोजी पारीत आदेश विचारात घेता, जरी शासनाकडुन अनुदान प्राप्त होत नसेल, तरी शासनाच्या परवानगी आधारावर काम केले जाते. त्यामुळे अशा संस्थांना Public Authority म्हणुन गृहीत धरता येईल. त्यानुसार सर्व शैक्षणिक माहविद्यालय यांना माहिती कायदा लागु होत आहे असा आदेश दिला आहे. तसेच सदर आदेशात मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर रिट पिटीशन क्र.५१३२/ २००८ मध्ये दिलेल्या आदेशाची सुध्दा दखल घेतलेली आहे. यावरुन संबंधित संस्थेला माहिती कायदा लागु होत आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी प्राचार्य, दि महाराष्ट्र मेडिकल, एज्युकेशन ॲन्ड रिसर्च सेंटरचे जुलेखबाई वली मोहम्मद युनानी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, आझम कॅम्पस, पुणे ४११ ००१ यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे/ व्यक्तीश: विनामुल्य पुरवावी.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दि महाराष्ट्र मेडिकल, एज्युकेशन ॲन्ड रिसर्च सेंटरचे जुलेखबाई वली मोहम्मद युनानी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, आझम कॅम्पस, पुणे ४११ ००१ यांनी अपिल आदेशाची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरूध्द अधिनियमाच्या कलम २०(१)नुसार कारवाई का करणेत येवू नये? याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

३. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, दि महाराष्ट्र मेडिकल, एज्युकेशन ॲन्ड रिसर्च सेंटरचे जुलेखबाई वली मोहम्मद युनानी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, आझम कॅम्पस, पुणे ४११ ००१ यांनी वरील आदेशाची विहीत कालावधीत अंमलबजावणी होईल याबाबतची दक्षता घ्यावी.

या निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. 5332/2024 दिनांक - 7/10/2024